मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 15 जून 2025 | पान- 1

# शहरातील 32 प्रभागांसाठी तीन हजार 102 प्रगणक गट

## महापालिकेची निवडणूक चार सदस्यांच्या प्रभाग पद्धतीने घेण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचनेसंदर्भात तीन दिवसांपूर्वी आदेश आल्यानंतर आता राज्य सरकारने प्रभागरचना करण्यासाठी वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार ४ सप्टेंबर रोजी अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध होणार आहे. शहरातील ३२ प्रभागांसाठी तीन हजार १०२ प्रगणक गट आहेत. या गटांच्या मांडणीचे काम सुरू करण्यात आले असून, हे काम १६ जूनपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.



महापालिकेची निवडणूक चार सदस्यांच्या प्रभाग पद्धतीने घेण्यात येणार असल्याचे राज्य सरकारने निश्चित करून प्रभाग रचना करण्याचा आदेश मंगळवारी दिला. मात्र, यामध्ये प्रभाग रचना करण्यासाठी नेमका कालावधी दिला नव्हता. त्यामुळे निवडणूक कधी होईल, प्रभाग रचनेला किती कालावधी लागेल, याबाबत प्रशासनासह सर्वच राजकीय पक्षांच्या इच्छुकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. नगरविकास विभागाने गुरुवारी प्रगणक गटाची मांडणी, स्थळ पाहणी, नकाशे तयार करणे अशा विविध बाबींच्या साहाय्याने प्रारूप प्रभाग रचना करावी. या प्रभाग रचनेवर हरकती, सुनावणी घ्यावी. सुनावणीनंतर हरकती व सूचनांवरील शिफारस विचारात घेऊन अंतिम प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी पाठविणे, आयोगाने अंतिम केलेली प्रभाग रचनेबाबत अधिसूचना प्रसिद्ध करणे, यासाठी निश्चित कालमर्यादा सरकारने दिली आहे. त्यामुळे ही सर्व प्रक्रिया ४ सप्टेंबर २०२५ अखेरपर्यंत पूर्ण करावी लागणार आहे. या सर्व प्रक्रियेला तीन महिन्यांचा कालावधी जाणार आहे.

राज्य शासनाच्या आदेशानंतर महापालिकेचा निवडणूक विभाग कामाला लागला आहे. प्रारूप प्रभाग रचना तयार करण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत आवश्यक असलेले अधिकारी-कर्मचारी निवडणूक विभागाकडे उपलब्ध आहेत. आवश्यकतेनुसार अधिकारी, कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात येणार आहे. २०११ च्या जनगणनेनुसार असलेले तीन हजार १०२ प्रगणक गट घेतले आहेत. एका गटात ७५० लोकसंख्या आहे. या गटांच्या मांडणीचे काम तत्काळ सुरू करण्यात आले आहे. त्याचे काम १६ जूनपर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याचे निवडणूक विभागाने सांगितले.

### मुख्यालयात निवडणूक विभागाचे कार्यालय

» निवडणुकीसाठी महापालिका मुख्यालयातील तळमजल्यावर निवडणूक विभागाचे कार्यालय निश्चित करण्यात आले आहे. याच कार्यालयातून निवडणुकीचे कामकाज चालणार आहे.

### लोकसंख्येएवढेच मतदार?

» २०११ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या १७ लाख २९ हजार ३५९ आहे. या लोकसंख्येनुसारच महापालिकेची निवडणूक होणार असून, नगरसेवकांची संख्या १२८ राहणार आहे. विधानसभा निवडणुकीवेळी चिंचवड, पिंपरी, भोसरी आणि भोर विधानसभा मतदारसंघाचा काही भाग असे १६ लाख २६ हजार ५४० मतदार आहेत. दरम्यानच्या काळात एक लाख मतदार वाढल्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. त्यामुळे जेवढी लोकसंख्या, तेवढीच मतदारांची संख्या होण्याचा अंदाज आहे.

---

# मावळमध्ये विकास कामांचा धडाका, आहिरवडेतील जोडरस्त्याचे कामाला गती!

## शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांचा पुढाकार : विविध कामांसाठी निधी उपलब्ध

**पिंपरी | प्रतिनिधी**

शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी मावळ तालुक्यात विकास कामांचा सपाटा सुरूच ठेवला आहे. ग्रुप ग्रामपंचायत आहिरवडे येथील जोड रस्त्यांसाठी पाठपुरावा करून ५० लाखांचा निधी मंजूर करून आणला. त्यातून राष्ट्रीय राजमार्ग ४ ते आहिरवडे जोडरस्त्याच्या सुधारणा कामांचे भूमिपूजन खासदार बारणे यांच्या हस्ते गुरुवारी झाले.




यावेळी शिवसेना उपजिल्हा प्रमुख शरदराव हुलावळे, युवासेना मावळ लोकसभा अध्यक्ष विशाल हुलावळे, शिवसेना उपतालुका प्रमुख धनंजय नवघने, शिवसेना देहूगाव शहर प्रमुख सुनिल हगवणे, सरपंच सविता काजळे व उपसरपंच स्वाती पाराटे उपस्थित होते. तसेच नवनाथ हरपुडे, संभाजी शिंदे, भाऊ बराटे, दिपक चव्हाण, सचिन चव्हाण, सतीश इंगवले, मदन शेडगे व ग्रामस्थ उपस्थित होते.

खासदार बारणे यांनी सर्वाधिक निधी डोंगरभाग, आदिवासी पाडे असलेल्या मावळ तालुक्याला दिला आहे. जिल्हा नियोजन समिती, खासदार निधी मावळच्या विकासाठी दिला आहे. राजमार्ग ४ ते आहिरवडे जोड रस्त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या दळणवळणात मोठी सोय होणार असून, स्थानिक विकासाला गती मिळणार आहे. ग्रामस्थांनी खासदारांच्या या प्रयत्नाचे कौतुक करत आभार मानले. उपस्थित मान्यवरांनी या कामाचे लवकरात लवकर पूर्णत्वासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

खासदार बारणे म्हणाले की, मावळ तालुका मोठ्या प्रमाणात विस्तारला आहे. कमी लोकवस्ती असलेली गावे आहेत. या गावांमधील अंतर्गत रस्ते पक्के नाहीत. त्यामुळे नागरिकांचे हाल होत होते. गावातील रस्ते विकास करण्यावर भर दिला. वाड्या, वस्त्यांपर्यंत रस्ते करण्यास प्राधान्य दिले आहे. सर्वाधिक निधी मावळसाठी दिला आहे. दीनदयाळ योजनेअंतर्गत दुर्गम भागातील गावांमध्ये वीज पोहोचविली आहे. राजमार्ग ४ ते आहिरवडे या जोड रस्त्याची दुरवस्था झाली होती. या रस्त्याची दुरुस्ती करण्याची स्थानिकांनी मागणी केली होती. त्यानुसार या कामासाठी ५० लाख रुपयांचा निधी दिला आहे. त्यातून रस्त्याच्या कामाला सुरुवात केली आहे. काम वेगात आणि दर्जेदार करण्याच्या सूचना संबंधित ठेकेदाराला दिल्या आहेत. या जोड रस्त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाची मोठी सोय होणार आहे.

# पालखी सोहळ्याची जय्यत तयारी

## तुकोबांच्या पालखीचे 18 तर ज्ञानोबांच्या पालखीचे 19 जूनला प्रस्थान

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी वारीसाठी श्री संत तुकाराम महाराज आणि श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळा अवघ्या पाच दिवसांवर येऊन ठेपला आहे. या पार्श्वभूमीवर संस्थानने जय्यत तयारी केली आहे. पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांना पिण्याचे स्वच्छ पाणी, आरोग्य सेवांसह तंबूंची तयारी केली आहे. शिधा व साहित्याची खरेदीही झाली आहे. जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज पालखी सोहळा येत्या १८ जूनला देहूतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. तर, आळंदी येथून श्री संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी १९ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. पालखी सोहळा अवघ्या पाच दिवसांवर आला असून, तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.




> चोवीस तास पिण्याचे पाणी पुरविण्याचे नियोजन केले आहे. धर्मशाळा आणि तंबूत राहणाऱ्या वारकऱ्यांसाठी अठरा टँकरद्वारे मागणीप्रमाणे पाणीपुरवठा केला जाईल. वारकऱ्यांच्या सुरक्षासाठी नगर परिषदेच्या वतीने शहरातील वर्दळीच्या आणि गर्दीच्या ठिकाणी १३० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. सिद्धबेट, नदी घाट, नवीन पुलासह संपूर्ण महत्त्वाच्या ठिकाणांची स्वच्छता पूर्ण झाली आहे. वारी कालावधीत तीन पाळ्यांमध्ये साफसफाई केली जाणार आहे. फिरत्या शौचालयांची उपलब्धता केली आहे. दिवाबत्तीची कामे पूर्ण झाली आहेत.
>
> **- माधव खांडेकर, मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद.**

देहूचे पालखी सोहळा प्रमुख गणेश महाराज मोरे म्हणाले, ‘पालखी सोहळ्यातील चांदीचा रथ, अब्दागिरी यांना पॉलिश करण्यात आले आहे. पालखी सोहळ्यात रथापुढे २७ आणि रथामागे ३९० दिंड्या चालणार आहेत. सोहळ्यातील सर्व दिंडीप्रमुखांना संस्थानने पत्रव्यवहार केला आहे. पालखी मार्गावर भाविकांना विविध सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी पाणी, आरोग्य, वीज, रस्ते विभागाला पत्रव्यवहार केला आहे. पालखी मार्गावरील अन्नदानासाठी लागणारे साहित्य खरेदी केले आहे. टाळ, मृदंग, पखवाज, वीणा व पूजेच्या साहित्याची खरेदी करण्यात आली आहे. मानकरी, सेवेकरी, दिंडीप्रमुखांना पत्रव्यवहार केला आहे. देऊळवाड्यातील स्वच्छतेसाठी कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, सुरक्षारक्षकही तैनात करण्यात आले आहेत. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी ३२ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.”

चोवीस तास पाणीपुरवठा, पिण्याच्या पाण्याचे बारा टँकर, पाच फिरत्या टँकरद्वारे पाणीपुरवठा, सुलभ स्वच्छतागृहे, जंतूनाशक औषधी, धूर फवारणी देहू नगरपंचायतीने केली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोर यादव म्हणाले, ‘पुरेसा औषधसाठा उपलब्ध आहे. उपचार केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्रात आंतर, बाह्य रुग्ण विभाग असणार आहे. रुग्णवाहिका उपलब्ध केल्या आहेत.’

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळाप्रमुख डॉ. भावार्थ देखणे म्हणाले,‘दरवर्षी सायंकाळी पाचच्या दरम्यान पालखीचे प्रस्थान होत असते. मात्र, यंदा प्रस्थान सोहळा गुरुवारी आल्याने परंपरेप्रमाणे नित्य गुरुवारची माउलींच्या पालखीची मंदिर प्रदक्षिणा आणि आरती झाल्याशिवाय पालखीचे प्रस्थान करता येणार नाही. पालखी प्रस्थान सोहळ्यास दिरंगाई होऊ नये यासाठी नित्य गुरुवारची पालखीची मंदिर प्रदक्षिणा सायंकाळी साडेपाचच्या दरम्यान काढली जाणार आहे. त्यानंतर आरतीचा कार्यक्रम साडेसात वाजता होईल. मानाच्या ४७ दिंड्यांना देऊळवाड्यात प्रवेश दिला जाणार आहे. रात्री आठनंतर पालखीचे प्रस्थान होईल. चांदीच्या रथाला पॉलिश करण्यात आले आहे. देवांचे राजेशाही अलंकार, चांदीचे भांडे, सिंहासन अशी सर्व तयारी पूर्ण झाली आहे. श्री गुरू हैबतबाबांनी ठरवून दिलेल्या प्रथेप्रमाणे सोहळा पार पडेल.

# पुण्याच्या स्वच्छतेसाठी विशेष मोहीम, आयुक्तांचा पुढाकार

## शहरात पुढील काही दिवसांत विशेष मोहीम राबविली जाणार : आयुक्त नवल किशोर राम

**पुणे | प्रतिनिधी**

स्वच्छ शहर, सुंदर शहर असे देशपातळीवरील अनेक पुरस्कार मिळवूनदेखील शहरातील अनेक रस्त्यांवर कचरा तसेच घाणीचे साम्राज्य असल्याचे वारंवार समोर आले आहे. यावर उपाययोजना करण्याबरोबरच स्वच्छतेमध्ये नागरिकांचा सहभाग वाढावा, यासाठी शहरात पुढील काही दिवसांत विशेष मोहीम राबविली जाणार आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी त्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.




> केंद्र, राज्य पातळीवर स्वच्छतेबाबत अभियान राबविले जाते. पुणे शहर स्वच्छ ठेवण्यासाठी त्याच पद्धतीने अभियान राबविण्याचा प्रयत्न आहे. यासाठी समाजातील सर्व घटकांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी चर्चा करून त्रुटी दूर केल्या जाणार आहेत. स्वच्छता मोहिमेत सर्वांचा सहभाग कसा होईल, यासाठी प्रयत्न राहणार आहे.
>
> **- नवल किशोर राम, महापालिका आयुक्त.**

स्वच्छतेच्या संदर्भात नागरिकांचा सहभाग, जनजागृतीबरोबरच प्रशासकीय यंत्रणेतील त्रुटी दूर करण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना सांगितले. महापालिका आयुक्तपदाची जबाबदारी घेतल्यानंतर पहिल्याच बैठकीत त्यांनी स्वच्छतेच्या कामाला प्राधान्य देणार असल्याचे स्पष्ट केले होते. त्याचाच एक भाग म्हणून शुक्रवारी पुणे शहरात स्वच्छतेचे काम करणाऱ्या ६० पेक्षा अधिक स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींची (एनजीओ) बैठक बोलाविली होती. या संस्थांकडून स्वच्छतेच्या संदर्भात सुरू असलेल्या कामाची माहिती घेण्यात आली.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन, पृथ्वीराज बी. पी., ओमप्रकाश दिवटे तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांच्यासह घनकचरा विभागातील अधिकारी यावेळी उपस्थित होते. स्वच्छ पुणे अभियानांतर्गत शहरातील कचरा वर्गीकरणाचे प्रमाण शंभर टक्क्यांपर्यंत नेणे, होम कंपोस्टिंगला प्रोत्साहन देणे, कचऱ्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प सुरू करणे, वस्ती पातळीवर जागृती मोहीम राबवणे, शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा शहर स्वच्छतेमध्ये सहभाग वाढविणे अशा विविध विषयांवर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. त्यानुसार येणाऱ्या काळात आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील, असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.

महापालिकेच्या यंत्रणेकडूनदेखील अनेकदा स्वच्छतेच्या कामाकडे दुर्लक्ष होते ही वस्तुस्थिती असल्याचे आयुक्त नवल किशोर राम यांनी मान्य केले. स्वच्छतेच्या कामात प्रशासकीय यंत्रणेच्या त्रुटी दूर करण्यावर यापुढील काळात अधिक भर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. शहरात स्वच्छतेचे काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांची तसेच झाडणकाम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या हजेरी संदर्भात लक्ष दिले जाईल. या कर्मचाऱ्यांची हजेरी नोंदविण्यासाठी त्यांना देण्यात आलेल्या उपकरणांची माहिती घेऊन यामध्ये अधिकाधिक पारदर्शकता कशी येईल. कर्मचाऱ्यांसह शहरातील नागरिकांचा सहभाग देखील यामध्ये कसा वाढेल, यावर भर राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# पालिकेचा स्वच्छ वारी उपक्रम, आरोग्य विभागाचा पुढाकार

## अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी वारीची नियोजन बैठक दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात पार पडली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी वारीची नियोजन बैठक दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात पार पडली.

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी आरोग्य व स्वच्छता सुविधा पुरविण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या पुढाकाराने विविध स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी वारीची नियोजन बैठक दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात पार पडली. या बैठकीस महापालिका उपआयुक्त सचिन पवार अध्यक्षस्थानी होते.

बैठकीस महापालिकेचे माजी नगरसदस्य जयंत बागल, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे , सहाय्यक आरोग्याधिकारी किशोर दरवडे, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, सुधीर वाघमारे, तानाजी दाते, शांताराम माने, राजेश भाट, महेश आढाव, कुंडलिक दरवडे,अंकुश झिटे, मुख्य आरोग्य निरीक्षक श्रीराम गायकवाड तसेच संस्कार प्रतिष्ठान, गुणवंत कामगार मंडळ, वारकरी मंडळ, मराठवाडा सेवा संस्था, पिंची, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, निसर्ग संवर्धन मंडळ, संत निरंकार मंडळ (पिंपरी व भोसरी), सायकल मित्र मंडळ आदी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापालिका व स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त प्रयत्नांतून पालखीच्या आगमनपूर्व आणि प्रस्थानानंतरही परिसर स्वच्छ ठेवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या उपक्रमाचा उद्देश शहरात शिस्तबद्ध, सुरक्षित व स्वच्छ वातावरणात पालखी सोहळा पार पाडणे हा आहे. या उपक्रमासाठी पालखी मार्गावर विशेष स्वच्छता पथक नेमण्याच्या सूचनाही यावेळी दिल्या.

महापालिकेच्या वतीने वारकऱ्यांच्या सेवेबरोबरच सार्वजनिक आरोग्य सुरक्षित राखण्यासाठी नागरिकांनीही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेचे आवाहन आरोग्य विभागाचे उप आयुक्त सचिन पवार यांनी केले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी आरोग्य व स्वच्छता सुविधा पुरविण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या पुढाकाराने विविध स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे.



### या बैठकीत चर्चा व नियोजन..

- स्वच्छ व सुरक्षित सार्वजनिक स्वच्छतागृहांची मोफत उपलब्धता तसेच त्यांची स्वच्छता तसेच परिसरात आवश्यकतेनुसार जंतू नाशक फवारणी
- पिण्याच्या पाण्याची सोय
- आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबिरे
- फराळ वाटप
- स्वयंसेवकांच्या सहाय्याने रस्ते व परिसर स्वच्छता
- पालखी मार्गावर विशेष स्वच्छता पथकांची नेमणूक

> "महापालिकेच्या वतीने पालखी सोहळ्यासाठी स्वच्छता तसेच आरोग्यविषयक सर्व सुविधा पुरविण्यात येणार असून, हा उपक्रम स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने आणखी व्यापक पद्धतीने आरोग्य विभागाकडून राबविण्यात येईल. नागरिकांनीही पुढाकार घेऊन महापालिकेस सहकार्य करावे."
>
> - सचिन पवार (उप आयुक्त, आरोग्य विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका)

# मावळमध्ये पर्यटकांना त्रास होणार नाही, याची दक्षता घ्या; खासदार श्रीरंग बारणे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

## खासदार श्रीरंग बारणे हे विधानसभानिहाय बैठक घेत आहेत, त्यानुसार मावळ विधानसभा मतदारसंघाची आढावा बैठक वडगाव येथील पंचायत समिती कार्यालयात पार पडली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळ्यात लोणावळा, कार्ला, आंदर, पवन, नाणे मावळात मोठ्या संख्येने पर्यटक फिरण्यासाठी येतात. पर्यटकांना सुविधा द्याव्यात. त्यांना त्रास होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. पार्किंगच्या जागेत पाणी साचते. तिथे मुरुम टाकून दुरुस्ती करुन घ्यावी. पोलिसांनी पर्यटकांना केवळ धाक दाखवू नये. पर्यटकांना सुविधा द्यावी. चुकीचे कृत्य करणाऱ्या पर्यटकावर कारवाई करावी. अतिउत्साही पर्यटक धबधब्याखाली पाण्यात उतरतात. त्यासाठी कर्मचारी वाढवावेत. वाहतूक कोंडी होणार नाही, याची खबरदारी घ्यावी अशा सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

खासदार श्रीरंग बारणे हे विधानसभानिहाय बैठक घेत आहेत. त्यानुसार मावळ विधानसभा मतदारसंघाची आढावा बैठक गुरुवारी वडगाव येथील पंचायत समिती कार्यालयात पार पडली. या बैठकीला प्रांताधिकारी सुरेंद्र नवले, मावळ तहसीलदार विक्रम देशमुख, गट विकास अधिकारी कुलदीप प्रधान, वडगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रवीण निकम, तळेगावचे मुख्याधिकारी विजय सरनाईक, लोणावळा नगरपरिषदचे मुख्याधिकारी अशोक साबळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे

उप अभियंता संजय पाटील, क्षीरसागर उप, धनराज दराडे, कविता पाटील, पोलीस निरीक्षक प्रभापती पाटील, पोलीस उपनिरीक्षक दिपाली पाटील, पोलीस उपनिरीक्षक विजया म्हेत्रे, कृषी अधिकारी मारुती साळे, माजी सभापती गुलाब म्हाळस्कर, शिवसेना उपजिल्हा प्रमुख शरदराव हुलावळे, शिवसेना तालुका प्रमुख राजाभाऊ खांडभोर, शिवसेना उप तालुका प्रमुख राम सावंत, अमित कुंभार, धनंजय नवघने, देहूगाव शिवसेना शहर प्रमुख सुनील हगवणे, युवासेना उप जिल्हा प्रमुख दत्ताभाऊ केदारी, युवासेना मावळ लोकसभा अध्यक्ष विशाल हुलावळे, युवासेना तालुका प्रमुख राजेश वाघोले, माजी नगरसेविका कल्पना आखाडे, माजी सभापती ज्ञानेश्वर दळवी, मनीषा भांगरे, नितीन कुडे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम, महसूल, कृषी, पाणीपुरवठा सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



### अवैध धंदे बंद करा

मावळातील अवैध धंदे बंद झाले पाहिजेत. धाब्यावर अवैधपणे मद्य विक्री केली जाते. मावळात एमडी ड्रग मोठ्या प्रमाणात विकले जाते. शाळेजवळ गुटखा विक्री केली जाते. त्यावर कारवाई करावी. औषध फवारणी करावी. पावसाळ्यात होणाऱ्या आजारांपासून वाचण्यासाठी काही काळजी घ्यावी याबाबत आरोग्य विभागाने जनजागृती करावी. महावितरणने पावसाळ्यापूर्वी झाडांची छाटणी करुन घ्यावी. ज्या ठिकाणी डीपीची मागणी आहे, तेथे डीपी बसवावेत. पावसाळ्यात वीजपुरवठा खंडित होणार नाही, याची काळजी घ्यावी. जनजागृती करुन सुर्यघर आणि कुसूम योजना लोकांपर्यंत पोहचवावी. बियाणे, खतांची विक्री चढ्या दराने होणार नाही, याची काळजी घ्यावी.

# “संकल्पनेतील शिरूर” उपक्रमाची महत्त्वाकांक्षी सुरुवात

## शिरूर हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर माऊली कटके यांच्या प्रयत्नांतून शिरूर एस.टी. डेपोमध्ये नव्याने पाच एस.टी. बसेस दाखल झाल्या आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

शिरुर हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर माऊली कटके यांच्या प्रयत्नांतून शिरूर एस.टी. डेपोमध्ये नव्याने पाच एस.टी. बसेस दाखल झाल्या आहेत. या बससेवेचा लोकार्पण सोहळा तसेच विविध विकास कामांचा आढावा दौरा त्यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.

एस.टी. महामंडळाच्या माध्यमातून शिरूर शहर व तालुक्यातील प्रवाशांना आता आधुनिक व वेळेवर चालणाऱ्या बससेवेचा लाभ मिळणार आहे. या नवीन बसेसमुळे खास करून शिरूरच्या ग्रामीण व डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांना, शेतकऱ्यांना, महिला वर्गाला आणि नोकरदार नागरिकांना प्रवासात मोठा दिलासा मिळणार आहे.

आमदार माऊली कटके यांनी गेल्या अनेक महिन्यांपासून या सुविधेसाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या विनंतीवरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्वरित निर्णय घेतला. लोकार्पण सोहळ्यात आमदार कटके म्हणाले "शासनाच्या सहकार्याने शिरूरसारख्या वाढत्या लोकसंख्येच्या शहराला ही सेवा मिळणे गरजेचे होते. ही सेवा म्हणजे केवळ वाहतूक नाही, तर ग्रामीण जनतेसाठी नवा दुवा आहे.”

नियोजित दौऱ्यातून सर्वांगीण विकासाचा आढावा आमदार माऊली कटके यांनी शिरूर शहरात व तालुक्यात विविध ठिकाणी भेटी देऊन विकासकामांची प्रगती, नागरिकांच्या अडचणी आणि प्रशासनाच्या भूमिकेचा आढावा घेतला. नगरपरिषद आढावा बैठक नगरपरिषद कार्यालयात झालेल्या बैठकीत शहरातील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, नळपाणी योजना, रस्त्यांचे डागडुजी कामे, सांडपाणी निचरा इत्यादी बाबींवर सविस्तर चर्चा झाली.



### सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल्स आणि आरोग्य केंद्रे

» स्थानिक व ग्रामीण भागातील नागरिकांसाठी अत्याधुनिक वैद्यकीय सेवा टेली-मेडिसिन, आपत्कालीन कक्ष, मातृत्व सेवा यावर भरस्मार्ट शिक्षण सुविधा आणि शाळा,डिजिटल क्लासरूम्स, अभ्यासिका, कौशल्य विकास केंद्रेगरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती योजना, हायटेक बस स्थानक आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, क्लिन बस स्टॉप्स, डिजिटल वेळापत्रक, पर्यावरणपूरक बसेस, महिलांसाठी स्वतंत्र बस सुविधा, रस्ते व वीज व्यवस्था, रुंदीकरण, सुसज्ज व पथदिवे असलेले रस्ते, अंडरग्राउंड वायरिंग व एलईडी स्मार्ट लाइटिंग सिस्टम,सुसज्ज पार्किंग व ट्राफिक नियंत्रण, मल्टिलेव्हल पार्किंग प्रकल्प, स्मार्ट सिग्नल्स व सीसीटीव्ही यंत्रणा,शिरूरचा इतिहास जपणारे संग्रहालय (म्युझियम) या उपक्रमात नागरिकांचे अभिप्राय, सूचनांचा आदर ठेवून, जनतेच्या सहभागातून अंतिम आराखडा तयार केला जात आहे.

### आगामी विकासाला गती देणारा महत्त्वाचा टप्पा

» प्रत्येक शिरूरकराच्या स्वप्नातील शिरूर प्रत्यक्षात आणण्यासाठी “सर्वेक्षण – संवाद – संकल्पना – अंमलबजावणी” या चार टप्प्यांतून हा प्रकल्प राबवला जाणार आहे. या सर्व संकल्पनांचे रूपांतर प्रत्यक्ष प्रकल्पांत करण्यासाठी आमदार कटके यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला आणि शासनाकडे जमा असलेली शिरूर शहरातील १७ एकर जागा पुन्हा शिरूर नगरपरिषदेच्या ताब्यात मिळवण्यास ते यशस्वी ठरले. हे यश म्हणजे शिरूरच्या आगामी विकासाला गती देणारा महत्त्वाचा टप्पा आहे.

“शिरूर केवळ एक शहर नाही, तर आपली ओळख आहे. जसे आपण युरोप-अमेरिकेतील शहरे पाहतो, तशीच व्यवस्था, सौंदर्य आणि सुविधा आपल्या शिरूरमध्ये साकारू. शिरूर हे सांस्कृतिक वारशाचे केंद्र बनावे, यासाठी मी पूर्ण प्रयत्न करतोय. शिरूर हे केवळ तालुक्याचे नव्हे तर संपूर्ण पुणे जिल्ह्याच्या उत्तर-पूर्व भागाचे केंद्र आहे. त्यामुळे येथे सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, व्यापारी व उद्योजक यांच्या गरजा लक्षात घेऊन ‘सर्वांना सामावून घेणारे मॉडेल शिरूर’ उभारणार आहोत. ही फक्त योजना नाही, हा उपक्रम म्हणजे आमदार कटके यांची शिरूरकरांशी असलेली बांधिलकी आहे.

- माऊली कटके आमदार (शिरूर हवेली विधानसभा )

# सोपानदेवांच्या समाधी मंदिरात अतिरेकी हल्ला!

## सासवड हादरले : पोलिसांच्या शिताफीनी उलगडला थरारक मॉकड्रिलचा रंगमंच

**पुणे | प्रतिनिधी**

मंदिरात दोन अतिरेकी शिरलेत... बॉम्ब ठेवलाय! सकाळच्या शांत वातावरणात हे वाक्य वाऱ्यासारखे पसरले आणि क्षणात सासवड हादरले. सोपानदेव महाराजांच्या समाधी मंदिरात सुरू असलेल्या भाविकांच्या गर्दीत एकच खळबळ माजली. पोलिसांची धावपळ सुरू झाली, मंदिर रिकामे केले जाऊ लागले, आणि शहरभर भीतीची लाट पसरली. पण या घडामोडींमागचे सत्य जरा वेगळेच होते. हे होते एक थरारक मॉकड्रिल, म्हणजेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी घेतलेली सराव कवायत!

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर, हजारो भाविक सासवड शहरातून पालखीसोबत जातात. त्यात जर अचानक अशी आपत्ती उद्भवली, तर पोलीस यंत्रणा कशी प्रतिक्रिया देईल, याची कसोटीच घेतली जात होती. पण हा सराव इतका खऱ्यासारखा होता की, क्षणभरासाठी संपूर्ण शहरात भीतीचे सावट पसरले. सकाळीच मिळालेल्या मगोपनीय माहितीफनुसार मंदिरात दोन अतिरेकी लपून बसले आहेत आणि त्यांनी स्फोटके लावली आहेत, असा संदेश मिळताच सासवडचे पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी यांनी आपली टीम सक्रिय केली.

अवघ्या काही मिनिटांत 15 पोलिसांचा बंदोबस्त मंदिर परिसरात दाखल झाला. भाविकांना शांतपणे बाहेर काढण्यात आले. दरम्यान, बॉम्बशोधक व नाशक पथक, दहशतवादविरोधी पथक, क्युआरटी आणि ड्रोन युनिटला पाचारण करण्यात आले. बॉम्बशोधक व नाशक पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश साळुंखे, प्रकाश पवार पोलीस हवालदार गणेश फापाळे सतीश गोजगे चंद्रशेखर मगर सहाय्यक फौजदार बाळासाहेब वाईकर राजू जठार ड्रोन पथक संदीप जगताप श्वान वीरा बेल्जियम तर गोपनीय विभागाचे रुपेश भगत, सुरज नगरे यांनी उपस्थित होते.



### पोलिसांची सज्जता, कार्यक्षमता आणि निर्णयक्षमता

» साऱ्या कृतीत एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली – ती म्हणजे पोलिसांची सज्जता, कार्यक्षमता आणि निर्णयक्षमता. जवानांनी प्रत्येक क्षणाला सजग राहून, कोणतीही घबराट न करता परिस्थिती नियंत्रणात आणली. हा मॉकड्रिल जरी काल्पनिक असला, तरी तो प्रत्यक्ष हल्ल्याचे खऱ्याखुरे चित्र उभे केले होते.

### अतिरेकी हल्ला हाणून पाडला

» जवानांनी बंदुका खांद्यावर घेतल्या आणि संशयास्पद पिशव्या शोधायला सुरुवात झाली बेल्जियम जातीच्या वीरा या श्वानाने एका कोपऱ्यात जाऊन भुंकायला सुरुवात केली – आणि साऱ्यांचे लक्ष तिकडे वळले. त्या ठिकाणी ठेवलेली एक पिशवी संशयास्पद असल्याचे स्पष्ट झाले. बॉम्बनाशक पथकाने तात्काळ ती पिशवी निष्क्रिय करत अतिरेकी हल्ला हाणून पाडला.